अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,
आस्थापना विभाग, पुणे मनपा.
जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/2809
दिनांक :- 22/06/2021

**-: कार्यालयीन आदेश :-**

विषय :- कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.
प्रसृत करण्यात आलेल्या विविध आदेशातील उप शिक्षक यांना कार्यमुक्त करणे बाबत

संदर्भ :- १) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/४७७ दि.२०/०४/२०२१ चे स्मार्ट सिटी कार्यालय आदेश
५) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/८७१ दि.०३/०५/२०२१ चे रोटेशन आदेश

कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत पुणे महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. त्या दृष्टीने शिक्षण विभाग (प्राथमिक)कडील उपशिक्षकांना कंटेन्मेट झोन करिता GIS आधारीत कामकाजासाठी, स्मार्ट सिटी कार्यालय सिंहगडरोड,परदेशी नागरिक हॉटेल व्यवस्था करणेसाठी व लोहगाव विमानतळावर संदर्भ क्रं ४ ते ५ अन्वये रोटेशन नुसार उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ४ ते ५ चे आदेशातील सद्यस्थितीत कंटेन्मेट झोन करिता GIS आधारीत कामकाजासाठी, स्मार्ट सिटी कार्यालय सिंहगडरोड,परदेशी नागरिक हॉटेल व्यवस्था करणेसाठी व लोहगाव विमानतळावर व इतर तदनुषंगिक कामासाठी नेमणूक केलेल्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील शिक्षकांना या कार्यालयीन आदेशाचे दिनांकापासून कार्यमुक्त करण्यात येत आहे. कार्यमुक्त झालेल्या शिक्षकांनी शालेय कामकाजासाठी तात्काळ रुजू व्हावे. यासाठी स्वतंत्र कार्यमुक्ती आदेशाची आवश्यकता नाही.

तरी संबंधित खातेप्रमुख/विभागप्रमुख यांनी आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी.

**(रुबल अग्रवाल)**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
**पुणे महानगरपालिका**

प्रत -
मा.महापालिका आयुक्त,
मा.अतिरिक्त आयुक्त (वि/इ) यांना माहितीस्तव.
प्रती –संबंधीत मा. खातेप्रमुख/प्रशासन अधिकारी, पुणे महानगरपालिका